# डेड लाईन

प्राजक्ता देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# डेडलाईन

लेखिका : प्राजक्ता संजयकुमार देशपांडे

## मनमोही

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# डेडलाईन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डेडलाईन

लेखिका प्राजक्ता संजयकुमार देशपांडे (मनमोही)

मो. नं: 9960378297

e- mail id : deshpandeps97@gmail. com

insta account : the_soul_of_writer_

ओम नगर, उदगीर, जि. लातूर, महाराष्ट्र - ४१३५१७

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : ९ जून २०२१(वैशाख कृष्ण चतुर्दशी १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त याचा कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



या पुस्तकाच्या लेखिका प्राजक्ता संजयकुमार देशपांडे सिविल इंजीनियर पदवीधर आणि M. E. structure च्या विद्यार्थिनी आहेत.

वाचन हा त्यांचा लहानपणापासूनचा छंद. त्यांच्या वडिलांकडून तो जणू वारसाहक्कानेच मिळालेला आणि नंतर लिखाणसुद्धा. त्यांचे वाचन अफ़ाट आहे. मोठंमोठ्या कादंबऱ्याही त्यांनी अगदी एका दिवसात वाचून पूर्ण केल्यात. सुहास शिरवळकर, शरदचंद्र वाळिम्बे, व. पु. काळे, सुधा मूर्ति असे वेगवेगळ्या धाटणीचे लेखक त्यांचे प्रेरणास्थान आहेत. आणि इंजीनियरिंगनेही त्यांना बरेच काही शिकवले असे म्हणायला हरकत नाही.

त्यांच्या कथेवर आपली मते वाचक त्यांना खालील पत्त्यांवर कळवू शकतात.

संपर्क :

प्राजक्ता संजयकुमार देशपांडे ( मनमोही )
मो. नं: 9960378297
e- mail id : deshpandeps97@gmail. com
insta account : the_soul_of_writer_

# अर्पण पत्रिका


निस्वार्थ प्रेमाचा झरा, माझ्या संस्कारांचा स्त्रोत असणाऱ्या
माझ्या स्वर्गीय आजीस अर्पण.



प्राजक्ता देशपांडे यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके.

कव्हरवर फ़क्त एक क्लिक करा आणि 'तिळा तिळा दार उघड' म्हणा, पुस्तक हजर.



# डेडलाईन

## वेशीपलिकडल्या रहस्याचा उलगडा

डेडलाइन ही कथा देव पटवर्धनच्या अवती भोवती फिरणारी आहे. एक निस्वार्थ, हुशार वकील जो त्याच्या विलक्षण बुद्धीने वेगवेगळया केसेस सोडवतो. 'गुढ काळोखाची रात्र' या कथसंग्रहाच्या शेवटी देवला एक सरप्राईज मिळणार होते. ते सरप्राईज काय आहे हे या कथेमध्ये सांगितले आहे. त्यासोबतच देवसमोर आजपर्यंत कधी आले नाही असे आव्हान आले आहे. ह्याची उत्सुकता नक्कीच वाचकांच्या मनात असेल.

समाजात काहीतरी बदल घडवून आणणाऱ्या, सर्वसामान्य साच्यापेक्षा वेगळे असणाऱ्या लोकांना नेहमीच खुप संघर्ष करावा लागतो. तरीही अश्या लोकांना प्रेरणा ही सदैव मिळत असते. ह्या कथेमध्येही काही असेच आहे. माणसाच्या प्रवृत्तीच्या किती तऱ्हा आहेत ते या कथेत पाहायला मिळतील.

आपल्या आजूबाजूला वाईट प्रवृत्तीची माणसे असली तरी देव पटवर्धन सारखी माणसेही आहेत. दुसऱ्याच्या आयुष्यातील दुःख दुर करणाऱ्यांच्याही आयुष्यात दुःख हे असतेच. एकटेपणाचं दुःख हृदयात घेऊन हसत मुखाने फिरणारा देव स्वतःच्या दुःखावरही मात करेल का?

# डेडलाईन

**सदरील कथा काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.**

पुणे.

पुणे प्रसिद्ध आहे त्याच्या वेगळेपणामुळे. पुण्यातील रस्ते, पुण्यातील लोक, पुणेरी खाद्य पदार्थ, पुण्यातील पेठ आणि पुणेरी पाट्या या विषयी तर सगळ्यांनाच माहिती आणि कुतूहल आहे.

देव सदाशिव पेठेत राहात होता, त्यामुळे हे सगळे पुणेरी वेगळेपण निश्चित त्याच्या अंगी भिनलेले होते. समोरच्याला गोड पण वक्र कसे बोलायचे हे त्याला चांगले अवगत होते.

आशिषला त्याचे वागणे पाहून नेहमीच कुतूहल वाटायचे.

कारण त्याला असे समोरच्याला निरुत्तर करता येत नव्हते. तो बिचारा समजून उमजून, कधी माघार घेऊन तर कधी मनाविरुद्ध लोकांची कामे करून द्यायचा. देवकडून आर्थिक किंवा कायद्याची मदत हवी असल्यास लोक हमखास आशिषकडे यायचे. आशिषचा शब्द देव कधी नाकारणार नाही, म्हणून सगळे आशिषला आपल्या बोलण्यात अडकवून घ्यायचे. पण देवसुद्धा काही कमी नव्हता.

तोसुद्धा लोकांना त्याच्या शब्दजाळयात अडकवून त्याला हवे असतील असे शब्द वदवून घ्यायचा. आता परवाचाच किस्सा घ्या ना.

आशीषच्या ओळखीतले एक गृहस्थ होते. ओळख म्हणजे अगदीच तोंड ओळख होती. पण आशिषला त्यांनी त्यांची कहाणी ऐकवून भावनिक केले आणि देवकडून मदत मिळवून द्यायचे आश्वासन घेतले. आशिषने त्यांना रविवारी सायंकाळी पाच वाजता सारसबागेत या, तिथे देव भेटेल असे सांगितले. त्यानंतर त्याने घडलेली हकीकत देवला सांगितली.

" देव, तू काही म्हण पण तुला बहुधा ह्या खेपेला त्यांचे काम करावेच लागणार. " आशिष.

" आशु, किती वर्षे झाली मला ओळखतोस तू?? हे असले घरभेदी लोक गल्लोगल्ली भेटतात म्हणून काही आपण त्यांना मदत नाही करायची. तू माझा भोळा सांब आहेस पण तुला खरं सांगू का, आजच्या काळात भोळा सांब नव्हे तर चतुर कृष्ण होण्याची गरज आहे. बघ तू, सारसबागेत मी अगदी व्यवस्थित नकार देतो. " देव.

त्यानंतर सारसबागेत ते गृहस्थ देवला भेटले. भेटल्यावर ते असे भासवत होते जसे की योगायोगाने त्यांची तिथे भेट झालेली आहे.

“अरे आशिषराव, तुम्ही इथे! नमस्कार तुम्ही नक्कीच देव पटवर्धन असणार. तुमच्याबद्दल खूप ऐकलंय. ” गृहस्थ.

“असं??? पण मला क्षमा करा मी तुमच्याबद्दल काहीच ऐकलं नाहीये. ” देव.

“विनोद बुद्धी चांगली आहे हो तुमची. मी आशिषरावांना चांगले ओळखतो आणि कित्येकदा त्यांच्यासोबत तुमच्या ऑफिसमधेही आलोय. मी रामकिशोर पाटील, आठवले का आता?”

“अजिबात नाही. तुम्ही ऑफिसमधे आल्याचे मला कसे आठवत नाही. ओळखीचे जाऊद्या हो, माझ्याकडे काही काम असेल तर आठवण ठेवा फक्त. ”

हा टोमणा कळेल इतके जग बहुधा त्यांनी पाहिले नव्हते. म्हणून पुढे बोलत राहिले.

“आता तुम्ही कामाचं बोललात तर आठवलं ते आमचे एक मित्र आहेत. त्यांच्या इस्टेटीविषयी थोडे घरात वाद चालू आहेत. ते मोठे आहेत घरात तर त्यांचा हिस्सा त्याप्रमाणेच हवा अशी काही

तरतूद करता येईल का?? स्वर्गवासी वडिलांची सही त्यांना चांगली करता येते. बाकी तुम्ही खूप हुशार आहातच.... " रामकिशोर.

स्वतः चे काम मित्राच्या नावावर खपवणारे देवला काही नवीन नव्हते. त्यांच्याच घरी इस्टेटीचे भांडण आहे हे देवला कळलेले होते. पण देवने सुद्धा अज्ञानाचे सोंग घेतले.

" वाह! मी तर हुशार आहे हो, पण तुमच्या एवढा कुठे. आणि तुमच्या मित्राचेच म्हणाल तर असे मित्र असणे तुमच्याही हिताचे नव्हे. जे लोक आपल्या घरातील लोकांसोबतच गैरव्यवहार करत असतील त्यांना मित्र म्हणून तुम्हीही जवळ करू नका. "

देवकडून असा सल्ला त्या गृहस्थांना अनपेक्षितच होता. पुढे काही सांगायचेही त्यांनी टाळले. आशिष पाहतच राहिला. घरी आल्यावर दोघेही खळखळून हसले. दुसऱ्यादिवशी दुपारी दोघे बोलत असताना अवांतर खूप विषय निघाले. न राहवून देवने आशिषला विचारलेच

"आशु, आपल्याला पुण्याला येऊन 10 दिवस झाले तू आणखी मला सरप्राईज विषयी काही सांगितले नाहीस. मी किती दिवस वाट पाहायची????" देव

“ देवा, तुला फार वेळ नाही थांबावे लागणार. आज संध्याकाळी आपल्याला एके ठिकाणी जायचे आहे तिथे गेल्यावर तुला कळेलच. ” आशिष

“अच्छा! एखादी जागा आहे का सरप्राईज?” देव

“सरप्राईज सांगू म्हणतोस??? एवढा पण भोळा नाहीये तुझा मित्र. ”

त्यानंतर देव विचार करत बसला. काय असेल सरप्राईज?? एखादी जागा??? नवीन केस तर नसेल?? या खेपेला लवकरच सोडवेन केस आणि मग आशुला माझं कौतुक करावंच लागेल. आशु खूपच उत्साही दिसत होता म्हणजे नक्कीच काही तरी भारी सरप्राईज असणार.

देव लवकरच तयार झाला. दोघेही संध्याकाळ झाल्यावर निघाले. सुर्य ढगाआड गेला होता तरी त्याचा थोडासा तांबूस प्रकाश येत होता. मस्त वारा सुटला होता. वातावरण वेगळाच उत्साह आणणारे होते. थोडा वेळ फर्ग्युसन कॉलेज जवळ फिरल्यानंतर आशु देवला घेऊन वैशाली हॉटेल जवळ आला.

देव विचारात पडला. “आज अचानक आशुने मला कॉलेज जवळ कशासाठी आणले असेल? 10 वर्षांपूर्वी कॉलेज सोडताना

जे काही घडलं त्यानंतर आशु स्वतः कॉलेज बद्दल काही बोलण्याचे टाळत असे. मला वाईट वाटू नये म्हणून त्याने आजपर्यंत कॉलेजच्या मित्रांसोबत भेटायचे टाळले. आणि आज तो अचानक मला असा जुण्या आठवणीकडे घेऊन आला. माझ्या मनात जी शंका येत आहे ती कदाचित खरी ठरली तर????? कोण भेटणार आहे वैशाली मध्ये???? पुन्हा तीच धडधड ते ही एवढ्या वर्षांनंतर. " देव त्यांच्या ठरलेल्या टेबलकडे वळला आणि क्षणभरासाठी त्याचे हृदय थांबले असा त्याला भास झाला. काही गोष्टींची कल्पना माणसाला ती घडण्याआधीच त्याचे हृदय त्याला संकेत देत असते हे खरच आहे. देवच्या मनात जी चलबिचल चालू होती त्याचे कारण त्याच्या डोळयासमोर उभे होते. अगदी तसेच जसे 10 वर्षांपूर्वी होते.

'मंजिरी'

हो, मंजिरीच. अगदी तशीच आहे. कॉलेज मध्ये तिला पाहायचो तशीच. एवढी वर्षे मधे गेली पण तिला पाहिले आणि सगळी वर्षे एका क्षणात कुठे तरी उडून गेली असं वाटलं कॉलेजच्या दिवसांमध्ये ती अशीच माझी वाट पाहायची आणि मी उशिरा

आल्यानंतर रुसून बसायची. तीच मंजिरी आजही माझी वाट पाहतेय अगदी तशीच.

मंजिरीला पाहिलं आणि 10 वर्षांआधीचा तो सुवर्णकाळ डोळयासमोरून तरळला. हो सुवर्ण काळच होता तो. त्याच्या आयुष्यात आलेले त्याचे पहिले प्रेम. लहानपणीच आई वडील गेल्यानंतर नोकरी करून त्याने स्वतः त्याचे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आणि उच्च शिक्षण घेण्यासाठी त्याने फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. वकिली सोडून दुसरे काहीही करायला त्याचे मन कधी तयार नव्हते जणू वकिली त्याच्या रक्तात भिनलेली होती.

साल २००९. कॉलेजचा तो पहिला दिवस. अर्थात आशु देव बरोबर होताच. उच्च शिक्षण घेणे हे देवचे स्वप्न च नाही तर एकमेव ध्येय होते त्यामुळे कॉलेजच्या त्या प्रवेशद्वारावर उभा राहून देव कॉलेजकडे पाहताना त्याच्या डोळयातले भाव कोणी ही जाणू शकत नव्हते. आशूलाही ह्या भावनेचा प्रत्यय येत होता पण आशुला विसरता येणार नाही असा भूतकाळ नव्हता. तो एकटा होता पण तो तसाच जगत आला होता त्यामुळे त्याला एकटेपणाची, पोरकेपणाची भावना काय असते हे माहिती नव्हतं. ज्याला दूध आणि पिठाच्या पाण्यातला फरक कळतो तो दुःखी

असतो पण ज्याने कधी दुधाची चव घेतलेली नाही त्याला त्याचे काय दुःख.

देवने आनंदी मनाने कॉलेज मध्ये पहिले पाऊल टाकले. हळू हळू पुढे जात असताना या अनोळखी कॉलेजसोबत त्याचे नाते जुळत होते. त्याच्या आयुष्यातील पुढची काही वर्षे या कॉलेजमध्ये जाणार होती. देव ह्या विचारांमध्ये होता आणि आशु मात्र आजूबाजूच्या लोकांचे परीक्षण करण्यात मग्न होता. हे काम त्याला मनापासून आवडायचे. दोघांनाही समोरच्याचे हावभाव टिपण्यात स्वारस्य होते. बोलणाऱ्यापेक्षा ऐकणाऱ्याला नेहमीच 2 गोष्टी जास्त माहिती असतात.

त्यांचा वर्ग कुठे आहे, पहिला तास कशाचा ह्या गोष्टी पाहून ते वर्गाकडे निघाले.

आणि वर्गात जाताच देवची पहिली नजर पडली ती मंजिरीवर. खळखळून हसत होती ती. मुळचे मोठे असणारे तिचे ते सुंदर डोळे हसताना छोटे होत होते. खळी नव्हती तिला पण तरी तिचे हसणे मोहक होते. तिचे ते हसणे पाहून असे वाटत होते किती सुंदर जग आहे हे. दुःखाची झालर जणू नाहीच या जगण्याला.

आशुने क्षणार्धात देवच्या चेहऱ्यावरचे भाव टिपले. पुढे काही दिवसांत देवची मंजिरीसोबत मैत्री होणार हे त्याला बहुधा त्याक्षणी

कळले होते. कॉलेज व्यवस्थित चालू होते. थोड्याच दिवसांत ते अभ्यासात रमले.

इथे येऊन आता त्यांना 2 महिने झाले होते. वर्गात वेगवेगळया मुलांचे संघ तयार झाले होते. कुठे चौकडी तर कुठे त्रिकोण, कुठे 10- 10 मुले एकत्र असायची तर कुठे देव आणि आशु सारखी दोघेच. मंजिरीसुद्धा 3-4 मुलींसोबतच असायची नेहमी. तिला चित्रकलेची आवड होती, ती नेहमीच त्यात मग्न असायची. कितीही वाटले तरी मंजिरीला बोलायची देवची हिम्मत झाली नाही.

एके दिवशी रिकाम्या तासात देव आणि आशु वर्गाच्या समोर असलेल्या बागेतच बसले होते. आणि तिथून त्यांनी पाहिले वर्गात कसली तरी गडबड चालली होती. कोणी तरी खूप रडत होते. आवाजावरून मुलगी आहे हे कळले होते. दोघेही पळतच वर्गात गेले. समोर मंजिरीच रडत होती. आणि तिच्या मैत्रिणी तिची समजूत काढत होते पण तिचे रडणे काही थांबत नव्हते. थोड्या वेळासाठी देवला असे वाटले की पळत जावे आणि तिचे अश्रू पुसावे. पण त्याने मनाला आवर घातला. सीमा तिच्या सोबत नेहमी असते म्हणून त्याने तिलाच विचारले

“सीमा, मंजिरीला काय झालयं?एवढी का रडतेय ती?”

“देव, अरे आम्ही वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये भाग घेतला होता. त्यासाठी 25 झाडे आम्हाला लावायची होती. झाडे लावताना हाथ खराब होतील म्हणून आम्हीच मंजिरीला तिच्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून ठेवायला सांगितल्या. आणि बॅग आम्ही वर्गातच ठेऊन बागेमध्ये गेलो होतो पण आता परत येऊन पाहिले तर बांगड्या तिथे नाहीत काय करायचे आता?? कशी समजूत काढायची मंजूची?? तिच्या आईने दिलेल्या बांगड्या होत्या त्या. आईची शेवटची आठवण. ”

देवला क्षणभर काही सुचलेच नाही मंजिरीची मदत करायची हे तर निश्चित होते पण सुरुवात कशी आणि कोठून करायची.

आशुला सोबत घेऊन देवने एका तासाभरात सगळी माहिती काढली. वर्गातील मुलांची चौकशी केली.

मुली वृक्षारोपण कार्यक्रमासाठी गेल्यावर वर्गात येणारे फक्त 20 जण होते. आणि त्या 20 मुलांजवळ काहीही भेटले नव्हते. आता पर्यंत शिक्षक सुद्धा मंजिरीची विचारपूस करत होते. शिक्षकांच्या चेहऱ्यावरून तरी ते थोडेसे घाबरले आहेत असे भासत होते. मंजु कोण्या मोठ्या घराण्याची मुलगी आहे यात आता काही शंका उरली नव्हती.

देवने 10 मिनिटे शांत विचार केला. वर्गात येणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण गृहीत धरले होते पण सफाई कामगार ?

देवने आशुला खुणावले. आणि आशूच्या ही लक्षात आले आपण बोलण्यात मग्न असताना एक नवीन मावशी वर्गाच्या बाहेर झाडू मारत होत्या. कदाचित आपले लक्ष नसताना त्या वर्गात जाण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. आशुने पळत जाऊन त्या मावशींना शोधून काढले.

आणि त्यांना घेऊन वर्गात सगळयांसमोर आणले. मावशी आता थोड्या घाबरलेल्या दिसत होत्या. पण बहुधा त्यांनी मनाची तयारी केलेली असावी म्हणून काही झालेले नाही आणि आपल्याला काही माहिती नाही असे दाखवत होत्या. शिक्षकांनी थोड्या कडक शब्दात विचारपूस केली. आज त्यांच्या कामाचा दुसराच दिवस होता

खरे सांगितले तर नोकरी गमवावी लागेल आणि नाही सांगितले तरी. देवने मावशीच्या डोळयातील चलबिचल लगेच हेरली. नक्कीच त्यांची काही अडचण असणार. देवने त्यांना बाजूला नेऊन प्रेमाने विचारपूस केली आणि मंजिरी बद्दल सांगितले.

“ मावशी, तुमच्यावर अन्याय होणार नाही. तुम्ही खरंच त्या मुलीच्या बांगड्या घेतल्या असतील तर त्या देऊन टाका. तुमची नोकरी जाणार नाही. त्या मुलीकडे जरा पाहा तिचे नाव मंजिरी आहे, तिच्या आईची शेवटची आठवण आहेत त्या बांगड्या. तुम्ही पण कोणाच्या तरी आई आहात. मुलीच्या डोळयांतील अश्रू नक्कीच तुम्हाला कळतील. बोला मावशी, तुम्ही घेतल्या आहेत का तिच्या बांगड्या?”

मावशी थोड्या विचारात पडल्या. ह्याला खरे सांगावे की नको पण देवच्या डोळ्यात पाहणारा माणूस घडाघडा बोलायला लागतोच.

“माझ्या मुलाला डोक्यात गाठ आहे असं मला डॉक्टरने 4 दिवस आधीच सांगितलं. त्याच्या ऑपरेशनसाठी हवे होते मला पन्नास हजार. बागेत त्या मुलींना बांगड्यांबद्दल बोलताना ऐकलं आणि वाटलं गुपचूप येऊन घेऊन जाव्यात. माझ्या मुलाच्या जीवाचा प्रश्न नसता तर कधी घेतल्या नसत्या तिच्या बांगडया. ”

मनावरचा भार सांगून मावशी रडत होत्या. देवने त्यांचे सांत्वन केले. आणि कशाचीही काळजी न करता त्या मुलीच्या बांगड्या परत करायला सांगितल्या.

बांगड्या घेऊन देव वर्गात सगळे जमले होते तिथे आला. प्राचार्य मोरे जवळ येऊन त्याने त्या बांगड्या त्यांच्या स्वाधीन केल्या आणि मावशीना कामावरून कमी करू नये म्हणून विनंती केली. सगळ्या वर्गातील मुलांना मावशीच्या मुलाला जमेल तितकी आर्थिक मदत करण्याची विनंती केली.

हे सगळे ऐकून मंजिरीला देवचे कौतुक वाटत होते. तिच्या मनात देवने आता त्याचे वेगळे स्थान निर्माण केले होते. मंजिरीने त्याचे मनापासून आभार मानले.

जसे जसे दिवस पुढे जात होते मंजिरी आणि देव यांचे नाते फुलत होते. एक घट्ट मैत्रीचा त्रिकोण तयार झाला होता. मंजिरी आता आशु आणि देव सोबत दिसत होती. बागेत बसून अभ्यास करणे, वेगवेगळ्या नाटकांना जाणे, संगीत मैफिलीना जाणे. खूप चांगला वेळ घालवला होता त्यांनी एकमेकांसोबत.

तिघांनाही ही तीन वर्षे कशी गेली ते कळलेच नाही. देव आणि मंजिरीचे नाते आता पूर्वीपेक्षाही सुंदर होते. न बोलताही दोघांना एकमेकांच्या डोळ्यातले भाव वाचता येत होते.

शेवटच्या परीक्षेला आता फक्त काही महिनेच उरले होते. सगळेच परीक्षेसाठी खूप मेहनत घेत होते. पण देवला जाणीव होत होती की परिक्षा झाल्यावर मंजिरी आपल्याला रोज भेटणार नाही.

“मला मंजिरीची जेवढी काळजी आहे तेवढीच तिलाही माझी आहे हे मला तिच्या बोलण्यावरून जाणवते आणि कित्येकवेळेस आशूनेही मला हे बोलून दाखवले आहे. कधी ना कधी ही गोष्ट बोलून दाखवावीच लागेल. हीच ती वेळ आहे”

आता देवने निश्चय केला होता. आज संध्याकाळी मंजिरीला सगळे सांगायचे. पण त्या आधी आशूला सांगितले पाहिजे.

“ आशु, तुला एक प्रश्न विचारू का???”

“ देव पटवर्धन चक्क आज माझी परवानगी घेतोय? सूर्य कुठे पश्चिमेला उगवला का आज?”

“ आशु, अरे मस्करी नको करू मी खरंच खूप टेन्शन मध्ये आहे”

“ बोल लवकर, काय झालं?”

“ हे बघ आशु, तूच एकटा आहेस ज्याने मला आणि मंजिरीला सोबत पाहिले आहे. आम्ही सोबत कसे असतो, आमच्या बद्दल तुला सगळे माहिती आहे. तुला काय वाटतं मी मंजिरीला विचारू का, तिला माझ्या बद्दल काय वाटत ते??”

“हा काय प्रश्न आहे का देव? तुलाही त्याचे उत्तर माहिती आहे, अरे तिच्या डोळ्यांत दिसतं नेहमीच ह्याच उत्तर. एवढा हुशार

आहेस तू, तुला तिचे डोळे नाही वाचता आले का? तुझ्यापेक्षा मीच हुशार मग.. ”

“आशु, अरे डोळे वाचता आले म्हणून तर विचारण्याची हिम्मत करतोय. काही गोष्टी स्पष्ट केलेल्या चांगल्या. ”

“विचार देव. होऊन जाऊदे तुझ्या मनासारखं. पण तिचं उत्तर हो असेल हे लिहून घे माझ्याकडून. तुला गरज नाही तशी तरी ऑल द बेस्ट! ! ! ! ! ! ”

देवने मंजिरीला नेहमीप्रमाणे संध्याकाळी भेटू असे सांगितले. सोबतच मला आज काही तरी महत्त्वाचे बोलायचे आहे असे सांगून तिच्या मनाची उत्सुकता वाढवली. मंजिरी हे ऐकून शांतच होती. अशी ती बऱ्याच वेळेस शांत असते. म्हणून देव तिला तेवढं बोलून निघून गेला.

संध्याकाळी ठरलेल्या वेळेआधी 1 तास तो ठरलेल्या जागेवर उपस्थित होता. आज एक एक मिनिट सुद्धा त्याला एक एक वर्ष वाटत होते. मंजिरीसोबतचे सगळे क्षण तो आठवत होता. आशु आणि मंजिरीचे त्याच्या आयुष्यात असणे त्याच्या आनंदाचे कारण होते. त्यांच्या सोबत घालवलेला प्रत्येक क्षण त्याच्या साठी एक सोहळा होता. मनोमन तो देवाला धन्यवाद देत होता. हलका

हलका वारा त्याला जाणवत होता. त्या वाऱ्यामध्ये त्याला मंजिरीचा आभास होत होता.

खूप वेळ होऊनही मंजिरी आलीच नाही. त्याला वाटले कदाचित आपण काय बोलणार याचा तिला अंदाज आला असेल. म्हणून ती आली नसेल का??

खूप वेळानंतर तो निघून आला. दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमी प्रमाणे कॉलेजला गेला. गेटवर मंजिरी होती आणि तिच्यासोबत कोणी तरी बोलत होते. जवळपास बरीच माणसे उभी होती. मंजिरीकडे पाहून त्यांच्यातील संवाद नक्कीच चांगला होत नव्हता हे कळत होते. आजपर्यंत आपण मंजिरीला खूप चांगले ओळखतो पण तिच्या घरच्यांबद्दल तिने आपल्याला काहीही सांगितले नाही हे आज देवला स्पष्ट जाणवत होते. देवने एक दोन वेळेस विचारण्याचा प्रयत्न ही केला होता पण मंजिरीने विषय बदलला होता. तिची इच्छा नसताना तिला विचारणे योग्य नाही म्हणून पुन्हा देवने घरच्यांचा विषय काढला नाही. देव मंजिरीकडे पाहत विचारात मग्न होता. मंजिरीनेही देवकडे पाहिले. दोघांची नजर एकमेकांना पाहत होती. देवच्या नजरेत असंख्य प्रश्न होते ते ओरडून ओरडून मंजिरीला काही तरी विचारण्याचा प्रयत्न करत होते.

“मंजिरी काल का नाही आलीस तू?

माझ्या मनात काय होते याची तुला कल्पना होती का???

हे सगळं काय चालू आहे??

तू कशी आहेस ??

तुला काही त्रास होतोय का???

तुझ्यावर आलेले संकट जाणून घ्यायचाही मला अधिकार नाही का???”

असंख्य प्रश्न. मंजिरीलाही त्या नजरेतील प्रश्न जाणवत होते आणि तिच्या नजरेत समुद्रात एखादी लाट खवळून यावी अश्या प्रकारे अश्रू येत होते. त्या अश्रूंनाही बरंच काही सांगायचे होते पण भावनेने भरून येणाऱ्या हृदयाला शब्द फुटत नसतात. शब्दांमधून भावना व्यक्त करणे सोपे असते पण जेव्हा भावना त्यांचा बांध ओलांडून वाहतात तेव्हा फक्त नजरेतून अश्रु ओघळतात.

डोळे पुसून मंजिरी गाडी मध्ये बसली आणि निघून गेली. त्या पाठमोऱ्या गाडी कडे पाहत देव नंतर किती तरी वेळ तसाच उभा होता. त्या दिवसानंतर मंजिरी त्याला आज दिसली. मधल्या

काळात असा एकही क्षण नव्हता जेव्हा मंजिरीचे विचार त्याच्या मनात आले नसतील पण ओठांवर मात्र ते कधीच आले नाहीत. आशुनेही त्या दिवसांनंतर प्रेम, लग्न, घर, संसार या बद्दल देवला कधीच विचारले नाही.

दुःखाने होरपळून निघालेल्या हृदयाला फुंकर घालणे सोपे नसते. तो विषय काढून त्या आगीला हवा देण्यापेक्षा त्या भावना संदुकात कैद ठेवणेच योग्य.

पण आज अचानक मंजिरीने समोर येण्याचे कारण देवला कळत नव्हते. थोडा वेळ जुजबी गप्पा झाल्या. बाकी कुठल्याही विषयावर जास्त वेळ चर्चा न करता मंजिरीने बोलायला सुरुवात केली.

‘‘देव, एवढ्या वर्षांत जेव्हा जेव्हा माझ्या मनात तुझा विचार आला तेव्हा मला फक्त एकच गोष्ट डोळ्यासमोर येत होती आणि ती म्हणजे तुझे ते डोळे. शेवटच्या भेटीत तुला पाहिल्यानंतर तुझ्या डोळ्यातील प्रश्नांनी मला अपराधीपणाची भावना दिली. उत्तरे न मिळालेली प्रश्न आयुष्यभरसोबत राहतात आणि मनाला बोचत राहतात. पण त्याला काही कारणे होती.

मला आई नव्हती एवढंच तुम्हाला माहिती होते पण माझे वडील राजकीय वर्तुळातील खूप मोठे नाव होते. राजकारण आणि त्यातील सूड, डावपेच, मत्सर या सगळयामुळे मी माझी आई गमावली. मला काही होऊ नये म्हणून अप्पानी मला इथे पाठवले. इकडे कोणी मला ओळखत नव्हते. परांजपे सर आमच्या आप्पांना खूप चांगलं ओळखत होते. त्यांनीच ह्या कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन दिला. सगळं खूप व्यवस्थित होतं. अप्पांना समाजसेवेची खूप आवड होती. त्यांच्या कार्यात राजकीय पाठिंबा असावा केवळ या एकाच हेतुने ते राजकारणात होते. खुप लोकांची साथ होती अप्पांच्या कार्याला. पण गावाची प्रगती करायची असेल तर गावातील लोकांना निरर्थक गोष्टींपासून वाचवणे गरजेचे होते म्हणूनच गावातील अंधश्रद्धा मुळापासून नष्ट करायची असं त्यांनी ठरवले. माझे काका ही त्यांच्यासोबत नेहमी असायचे.

आमचं गावही इतर गावांसारखंच असलं तरी त्याचा इतिहास मात्र इतरांपेक्षा खूप वेगळा आहे. फार पुर्वी गावावरती कुठल्या तरी डाकूने थैमान घातले होते. पैसा, जीव, बायकापोरे कोणीच सुरक्षित नव्हते. हिंमत एकवटून गावकऱ्यांनी त्या डाकूच्या टोळीला झोपेत असतानाच जीवंत जाळले. त्यानंतर गावावर वाईट सावलींचा प्रभाव दिसु लागला. त्या सावलीच्या असण्याने गावातील लोकांना एकमेकांबद्दल प्रेम, विश्वास, प्रामाणिकपणा ह्यापैकी कुठल्याही

भावना राहत नव्हत्या सगळीकडे भांडणे, द्वेष, हिंसा वाढली होती. कुठून तरी एक भैरवबाबा काशी यात्रेच्या मार्गावर असताना आमच्या गावात विसावा घेण्यासाठी आले आणि त्यांनी हा सगळा प्रकार पाहिला.

त्यानंतर पौर्णिमेला गावाच्या वेशीवर भैरवबाबांनी खूप मोठा यज्ञ केला. त्यावेळी गावाचा विनाश टळावा म्हणून विनाशाचं प्रतीक - एक उंदीर, गावात सूड वृत्ती येऊ नये म्हणून - एक साप, आणि माणसे मारली जाऊ नये म्हणून बळी - एक नारळ अश्या गोष्टी यज्ञकुंडात अर्पण केल्या. त्यानंतर गावात होणाऱ्या वाईट गोष्टी थांबल्या. आणि ही प्रथा गावात कायमची झाली.

वर्षानुवर्षे भैरवबाबांचे अनुयायी ही पूजा करत होते. अप्पांना या गोष्टींवर विश्वास नव्हता. आणखी किती वर्षे हीच परंपरा चालवायची. भैरवबाबांनी ही पूजा निस्वार्थपणे केली असेलही पण त्यांचे अनुयायी आज कितीतरी पैसे घेतात. गरीब गावकरी घाबरून इच्छा नसतानाही पूजा करतात. ह्या सगळ्या गोष्टी अप्पांना थांबवायच्या होत्या आणि म्हणून आमच्या घरापासून सुरुवात केली त्यांनी. पूजा करायची वेळ जेव्हा आमच्या घराची होती तेव्हा अप्पानी सरळ नकार दिला. त्यानंतर एक गोष्ट मात्र घडली. अप्पांना मार्गदर्शक समजणाऱ्या गावकऱ्यांनीही पूजेला नकार दिला.

हळूहळू परिस्थिती बदलत होती. पण त्याच सोबत काही विचित्र आणि भयानक घटना ही घडत होत्या.

गावातील लोकांना काळया सावल्या दिसत होत्या. त्या सावल्या त्यांचा पाठलाग करायच्या. वेगवेगळे आवाज ऐकू यायचे पण कोणी दिसायचं नाही. गावातल्या विहिरी जवळ रक्ताने माखलेले पावलांचे ठसे दिसायचे. अमावस्येला कुत्री रडायची कोणाच्या तरी घरी नेहमी कोणी आजारी असायचे, गावातील सुख शांती जशी हरवूनच गेली होती. आणि एका अमावस्येला रात्री अप्पांवर कोणी तरी हल्ला केला. घरामध्ये एवढे नोकर चाकर असूनही कोणी कोणालाच पाहिले नाही. कसलाच आवाज आला नाही. काकांना झोपेत कोणी तरी त्यांना पाहत आहे असा भास झाला म्हणून त्यांनी डोळे उघडले तर त्यांना काळी सावली दिसली. हे सगळं खूपच भयानक होतं. अप्पांना अर्धांगवायूचा झटका आला. ते फक्त पाहू शकत होते आणि ऐकू शकत होते. पण कसलीच हालचाल करता येत नव्हती.

म्हणून तातडीने काका मला घेऊन जायला आले कारण माझा लहान भाऊ मंदार खूप घाबरला होता. शाळेत जायला सुद्धा त्याने नकार दिला आणि अप्पांच्या खोलीतच सारखा बसून राहायचा.

घरी परतल्यावर घर, अप्पा, मंदार, गावातील लोक या सगळ्यांना सावरून घेण्यात मी स्वतःला विसरूनच गेले. अप्पांवर झालेल्या हल्ल्यानंतर गावकरी घाबरले. म्हणून गेली 10 वर्षे गावातील प्रथा तशीच चालू होती. पण 6 महिन्यापूर्वी अप्पा थोडे बरे झाले आणि बोलू लागले तेव्हा त्यांनी मला हे सगळं पुन्हा थांबवायला सांगितले

येत्या 4 दिवसात पौर्णिमा आहे पूजा करण्याची वेळ आमच्या घरावर आहे आम्ही पूजा केली नाही तर अमावस्येला काहीही विपरीत घडू शकतं. या मधल्या काळात तुझ्याबद्दल खूप ऐकलं मी. कोणत्याही परिस्तिथीमधून तू बाहेर काढू शकतोस, मला तुझ्या शिवाय दुसरा पर्याय दिसतच नव्हता म्हणून धावत आले. मला मदत करशील ना देव???? तुझी नवीन केस म्हणून तरी. ”

“ बापरे, खरं सांगू का मंजिरी, आज आशु जेव्हा मला इथे घेऊन आला तेव्हा माझ्या डोक्यात हाच विचार होता की कुठली तरी अशक्य केस तो माझ्यासमोर घेऊन येईल आणि मी ती सहज त्याला शक्य करून दाखवेन. तुझ्यासकट माझा भुतकाळ असा आज इथे भेटेल असं वाटलंच नाही. माझ्या मनात असंख्य प्रश्न होते हे खरंय पण आता सत्य परिस्तिथी कळल्यानंतर माझंही मन मला हलकं झाल्यासारखं वाटतंय. इतकं सगळं तू एकटीने सहन

केलंस, तुझं खरंच खूप कौतुक वाटतं मला. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणारी, देव वेळेवर आला नाही म्हणून रुसणारी ती निरागस मंजिरी परिस्थितीमुळे कितीतरी बदलुन गेली आहे. असो, बाकी गोष्टी बोलण्यासाठी आपल्याला खूप वेळ आहे पण आधी ही केस महत्त्वाची आहे.

एकूण परिस्थिती पाहता आपल्याला उद्याच निघाव लागणार आणि आपल्याकडे आता फक्त 15 दिवस आहेत.

केस सोडवण्याची *डेडलाईन*. ”

आशूला कल्पना होतीच देव नाही म्हणणार नाही त्यामुळे त्याने त्यांची निघायची व्यवस्था करून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ते भैरववाडीकडे निघाले. देव पूर्ण रस्त्यामधे विचारातच होता. भुत प्रेताची जी गोष्ट मंजिरीने सांगितली ती ऐकून कोणालाही खरे वाटणार नव्हते आणि देवला तर नाहीच पण देव स्वतः डोळ्याने पाहिल्याशिवाय कुठल्याही गोष्टीबद्दल त्याचे मत तयार करत नसे.

खरंच जर हे भूत प्रकरण असेल तर देवच्या सर्व गुणांची इथे कसोटी लागणार होती. देव मंजिरीने सांगितलेल्या सगळ्या गोष्टींची उजळणी करत होता.

देव पटवर्धन म्हणून गावात जाणे या वेळी योग्य नव्हते. त्याला कोणी पाहिले नसले तरी त्याच्या बद्दल खूप लोकांना माहिती होती. आणि म्हणूनच ही केस सोडवण्यासाठी काही तरी नवीन प्रयोग करण्याची ही वेळ आहे.

मंजिरीने सांगितले त्यानुसार ह्या सावल्या त्यांच्या विरोधकांवर हल्ला करतात. त्यामुळे सगळयात आधी त्यांना त्यांच्या नवीन शत्रुची ओळख करून द्यावी लागेल. त्यांच्या नजरेत येण्यासाठी देवला नवीन कल्पना सुचली. गावापासून थोड्या अंतरावर त्याने गाडी थांबवली. आशु आणि मंजिरीला त्याने आपली कल्पना सांगायला सुरुवात केली.

“मंजिरी, तू सांगितल्या प्रमाणे सगळया गोष्टींचा मी विचार केला आहे आणि या मध्ये मला देव पटवर्धनची गरज आहे असं वाटत नाही, एक वकील करू शकेल असं ह्या केस मध्ये काहीही नाही. ” देव.

“देव, अरे तू काय बोलतोय? आपण आता गावाजवळ आहोत इथे येऊन तू मदत करायला नकार देतोय?” आशु.

“ अरे आशु, मी देवची गरज नाही असं म्हणलं. ऐकून घे. कळेल तुला सगळं.

आपण जे आहोत तसेच गेलो तर ह्या सावल्या आपल्याकडे लक्ष देणार नाहीत. आपल्याकडून त्यांना धोका आहे हे कळल्याखेरीज त्यांचे लक्ष आपल्याकडे वळणार नाही. त्यामुळे आपण गुरुमहाराज आणि त्यांचा अनुयायी बनून या गावात प्रवेश करू. आपण आपल्या पारंपरिक आणि वैज्ञानिक पध्दतीने या गावाला वाईट प्रवृत्तीपासून वाचवण्यासाठी आलेलो आहोत असे भासवायचे आणि त्यात मंजिरी आपल्याला मदत करेल. मंजिरी तुझे काम आम्हाला मदत करणे असेल पण ते वेगळ्या मार्गांनी. आम्ही करत असलेल्या कामात तू आम्हाला थांबवायचं. कारण भूत पळवणे ही सुद्धा अंधश्रद्धाच. आणि तू गाव पातळीवर या कामात सक्रिय असल्यामुळे कोणालाही संशय येणार नाही. पुण्यावरून 2 माणसे भूत पळवून लावायला आलेली आहेत असेच सगळ्यांना वाटेल. आणि नक्कीच याचा फायदा आपल्याला होईल. आणि सत्य परिस्थिती काय आहे? कोण आहेत ह्या सावल्या, त्यांचे ध्येय काय या सगळ्या गोष्टींचा उलगडा होईल. ”

“अरे वाह देव, तू तर खुपच मस्त प्लॅन बनवला आहेस. मला खूप आवडेल हे असं सगळं नाटक करायला. आणि त्यासाठी वेशभूषाही करावी लागेल. खुप काम आहे मला मी भेटतो तुला थोड्या वेळात सगळ्या तयारी पुर्ण करून. ”आशु.

आशु तयारी करण्यासाठी निघून गेला. आता फक्त मंजिरी आणि देव दोघेच होते. गावाबाहेरची जागा होती. संध्याकाळची वेळ. सुर्य थोडासा तांबूस थोडा केशरी रंग उधळत होता. पक्षी आपल्या आपल्या घरी परतून जात होते. थंड वारा होता. कुठे तरी दुर हरवून जावं असेच वातावरण होते.

दोघेही शांत होते. फक्त एकमेकांच्या श्वासाचा आवाज येत होता. एवढ्या वर्षांचा संवाद करायचा, दोघेही त्यांच्या मनात काय बोलायचे म्हणून शब्दांची मांडणी करत होते पण दोघांनाही काहीच सुचत नव्हते. मंजिरीनेच बोलायला सुरुवात केली.

“ किती वर्षांनी भेटतोय आपण. असं वाटतंय आपण पहिल्यांदाच भेटतोय. ओळखीचे वाटणारे पण तरीही अनोळखीच. गेली 10 वर्षे इतकी कठीण आणि विचित्र होती की मी कधी त्यात हरवून गेले कळलंच नाही. पण तरीही काही तरी कमी होती आयुष्यात, एक पोकळी, एका मित्राची, आपल्या वाटणाऱ्या माणसाची.

मी माझ्या मनातील गोष्टी बोलून दाखवाव्यात अशी एकही व्यक्ती माझ्या आजूबाजूला नव्हती देव. कधी कधी वाटायचं की

सगळं सोडून पळून जावं कुठे तरी लांब. पण जबाबदारीचं ओझं हा विचार करण्याची परवानगी सुद्धा देत नव्हतं. परिस्थिती माणसाला किती समजूतदार आणि जबाबदार बनवते हे मला आता चांगलंच कळून चुकलं पण तरीही कुठे तरी वाटतं हे जे घडलं त्यापेक्षा काही वेगळं घडलं असतं तर माझं आयुष्य आज वेगळं असतं का????कुठे असते मी? तुझ्यासोबत असते का मी आता? एकटेपणात एवढी एकच गोष्ट होती माझ्या जवळ. जे घडलं नाही त्याचा विचार करायचा. हवेत स्वप्न रंगवण्याची पण वेगळीच मजा असते, हो ना?" मंजिरी.

" हो, मी हे निश्चित सांगू शकतो कारण मी ही ह्या वर्षांमध्ये हेच केले आहे. आशु आणि मी कधी या विषयावर बोललो नसलो तरी हा विषय कधीही डोक्यातून गेला नव्हता. तुझी आठवण नेहमीच माझ्या जवळ असायची. पण कधी तुझा शोध घ्यावा, तुला भेटावं याचं धाडस नाही केलं मी. तुझ्याकडून नकार ऐकण्याची शक्ती नव्हती बहुधा माझ्याकडे. पण तुझ्या मनातील गोष्टी ऐकून आता वाटतं हे धाडस करायला हवं होत मी. " देव

आशु सामान घेऊन आला. त्यानंतर मंजिरी एकटीच गावाकडे निघून गेली आणि देव आणि आशु थोड्या वेळानंतर गावाकडे निघाले. प्लॅन अगदी जसा ठरला होता तसाच चालू होता. गावात

गेल्यावर आशु आणि देव दोघेही मंदिराच्या बाजूला असलेल्या धर्मशाळेत उतरले. एव्हाना रात्र झाली होती. दुसऱ्या दिवसापासून त्यांना त्यांचं नाटक चालू करायचं होतं म्हणून दोघेही झोपले.

सकाळी उठल्यावर सगळयात पहिले त्यांनी आशुने आणलेल्या सामानातून काळी धोती, काळा कुर्ता परिधान केला. गळयात एक काळया आणि लाल मण्यांची माळ घातली. हातात रुद्राक्ष असलेली माळ बांधली. कपाळावर लाल कुंकू. हातामध्ये एक कमंडलू घेतले. मंदिराच्या बाहेर दोघेही ध्यानस्थ बसले.

हळू हळू मंदिरात दर्शन घेण्यासाठी गावातील लोक येत होते तसे नवीन आलेल्या ह्या गुरूंना पाहत होते. त्यातील एक जण चौकशी करावी ह्या हेतूने त्यांच्या जवळ गेला.

"अहो महाराज, कोण तुम्ही? या आधी कधी तुम्हाला या गावात पाहिले नाही. कुठे निघाला आहात??" गृहस्थ.

"अनेक आशीर्वाद. या गावात आमची चौकशी करणारे तुम्ही पहिलेच. तुम्हाला भरभरून सुख मिळणार आहे. हे आमचे गुरुमहाराज आहेत. आणि मी त्यांचा शिष्य. सगळे मला माऊली म्हणतात. आमच्या गुरुमहाराजांना या गावाबद्दल दृष्टांत झाला की

या गावात काही तरी गडबड आहे. कुठल्या तरी दुष्ट, काळया जादूने ही जागा शापित आहे. आणि तुम्हाला आमच्या महाराजांची गरज आहे. आमच्या गुरुमहाराजांना अशे अनेक दृष्टांत होत असतात. कितीतरी गावांचं भलं केलंय त्यांनी. आणि म्हणून आता तुमच्या गावात आलेले आहेत. पण एक गोष्ट मात्र आहे आमचे गुरुमहाराज बोलत नाहीत त्यांनी खूप वर्षांपासून मौन व्रत धारण केलेलं आहे. फक्त आशीर्वाद देतात. या घ्या तुम्हीही आशीर्वाद. ”

आशुने जवळपास काम केलेले होते. पण मौन व्रत घ्यायला काही देवने सांगितले नव्हते. ही आशूनेच केलेली गम्मत होती. देव प्रत्येक केस मध्ये काही तरी बोलून केस वेळे आधी सोडवतो. आणि ही केस त्याच्यासाठी आणखीन कठीण करण्यासाठी आशुने त्याला त्याच्या मनाविरुद्ध मौन व्रत घ्यायला लावले. देवला राग तर आलाच होता पण त्याने हे चॅलेंज ही घेतले होते. त्याने आपल्या कमंडलू मधून पाणी काढले. तोंडाजवळ नेले. काही तरी पुटपुटून ते पाणी त्याने त्या गृहस्थाच्या अंगावर शिंपडले.

आणि हळूहळू देवचा म्हणजेच गुरुमहाराज यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गावकऱ्यांनी गर्दी केली.

थोड्यावेळानंतर मंजिरी तिच्यासोबत 3-4 माणसे घेऊन आली. आणि तिने गुरुमहाराज आणि माऊलीला सुनावले.

“कोण तुम्ही? आणि तुम्हाला आमच्या गावाचा उद्धार करण्यासाठी कोणी बोलावले? हे बघा आम्ही असल्या अंधश्रद्धा आणि भोंदूबाबा याना बळी पडत नाही तुम्ही कृपया तुमचे बस्तान कुठे तरी दुसरीकडे बसवा. आम्हाला आमच्या परिस्थितीवर सोडून द्या. आम्ही या गावातून अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करत आहोत. आमच्या मार्गात अडथळे निर्माण केलेत तर त्याचे परिणाम वाईट होतील. ” मंजिरी.

मंजिरी गुरुमहाराज आणि त्यांच्या शिष्याला जे बोलत होती ते अख्खा गाव ऐकत होता. आणि आता गुरुमहाराज यावर काय प्रतिक्रिया देतात याचीच गावकरी वाट पाहत होते. पण गुरुमहाराज डोळे मिटून ध्यानस्थ बसलेले होते. माऊलीने गुरुमहाराजांच्या पायाला हात लावला. गुरुमहाराजांनी डोळे उघडून कमंडलू मधील पाणी माऊलीच्या डोळयाला लावले. माऊलीने 2 मिनिटे डोळे मिटले. आणि मग तो बोलायला लागला.

“ मुली, तुझी व्यथा आम्हाला कळते. तुझे वडील आजारी आहेत. हे गुरुमहाराज यांनी ध्यानस्थ असताना पाहिले. घाबरू नकोस तुझ्या वडिलांवर ज्यांनी कोणी हल्ला केला ते भूत, प्रेत, पिशाच्च, वनचर, निशाचर कोणीही असो गुरुमहाराज तुला त्याचा शोध लावून देतील. तू गुरुमहाराजांच्या पायाशी मनोभावे नतमस्तक हो. तुझ्या सगळ्या संकटांवर गुरुमहाराज त्यांच्या कमंडलू मधून पाणी सोडतील. ”

गावकरी चकित झाले. गुरुमहाराज आताच मंजिरीला भेटले आणि तिच्याबद्दल त्यांना सगळी माहिती झाली. हे महाराज साधे नाहीयेत. हे नक्कीच आपल्याला या सगळ्यातून सोडवतील. असे म्हणून सगळे गावकरी गुरुमहाराजांचा उदोउदो करू लागले. मंजिरी मात्र या सगळ्यावर चिडून तिथून निघून गेली. त्यानंतर गावकऱ्यांचा विश्वास आणखीच दृढ झाला.

गावकऱ्यांनी धर्मशाळेत गुरुमहाराज आणि माऊलीची चांगली व्यवस्था केली. त्यांच्या सेवेत गावातील 4 5 माणसे सतत राहू लागली. रोज संध्याकाळी गुरुमहाराज मंदिराजवळ ध्यानस्थ बसत आणि माऊली गावकऱ्यांना गुरुमहाराज यांनी उद्धार केलेल्या

गावाच्या गोष्टी सांगत. हे सगळे झाल्यावर गुरुमहाराज काही घरी जाऊन त्यांच्या कमंडलूतील पाणी शिंपडून ते घर पवित्र करत. अशी दिनचर्या 4 दिवसांपासून चालू होती.

आता धर्मशाळेच्या बाहेर एक दानपेटी ठेवलेली होती. गावकऱ्यांच्या विश्वासाची पातळी जशी जशी वाढत होती तशी तशी दानपेटीतील पैश्याची ही पातळी वाढत होती.

रात्री गुरुमहाराज यांची एकांत ध्यानधारणा असते. योगनिद्रेत ते परमात्म्याशी संवाद साधतात त्यामुळे कोणीही रात्री धर्मशाळेत थांबू नये असे सगळ्यांना सांगण्यात आलेले होते. उद्या चतुर्थी होती म्हणजे उद्यानंतर बरोबर अकराव्या दिवशी अमावस्या होती. रात्री देव आणि आशु दोघेही बोलत बसले होते.

“देव, अरे आपल्याला येऊन 4 दिवस झाले अजून कुठेच काहीच पत्ता लागत नाहीये. मला तर वाटतंय असच चालू राहील तर खरच आपल्याला गुरुमहाराज आणि माऊली म्हणून आयुष्य काढावं लागेल. पुढे काय करायचं ठरवलं आहेस तू?” आशु.

“ मी मौन धारण केलेले आहे आशु, लक्षात आहे ना तुझ्या. एवढ्यात मी काही सांगू शकत नाही. तू झोप माझी योगनिद्रेत जाण्याची वेळ झाली आहे. ” देव.

देवलाही आता आशुची गम्मत करायची होती. त्याला आता गावात काय चालु होते हे थोडेफार कळत होते. पुढे काय होऊ शकते ह्याची कल्पना ही त्याला आली होती पण आताच हे सगळे त्याला आशूला सांगायचे नव्हते. म्हणून तोही शांतपणे झोपी गेला.

मध्यरात्री दोघेही गाढ झोपेत असताना काहीतरी आवाज येत होते. कोणी तरी आपल्याला पाहत आहे असा भास आशूला झाला. आशुने डोळे उघडले. खोलीमध्ये पूर्ण अंधार होता. एक दिवा कोपऱ्यात तेवत होता. समोरच्या भिंतीवर त्याला कसलीतरी सावली दिसली. तसा आशु थोडा दचकला.

“ कोण आहे तिकडे? कोण आहे?”

आशुने 2- 4 वेळेस विचारले. तशी सावली पुढे सरकली. बाहेर कुत्री भुंकत होती. कसली तरी विचित्रच अनुभूती होत होती. आशुने देव कडे पाहिले तो अजूनही झोपलेलाच होता. त्याने देवला आवाज दिला.

“ गुरुमहाराज, ध्यानधारणा सोडा. मला कसली तरी वेगळीच शंका येत आहे. तुमच्या मार्गदर्शनाची गरज आहे. ”

तरीही देव झोपूनच होता. आणि रात्रभर त्या सावल्या आशूला झोपू देत नव्हत्या. पहाटे पहाटे आशूला झोप लागली. थोड्या वेळानंतर देव उठला आणि तयार होऊन ध्यानस्थ बसला. गावकरी येण्याआधी त्याने आशूला उठवले. आशुने रात्री घडलेली हकीकत सांगितली.

“ देव, अरे तुला नक्की वाटते का ही केस आपल्या हातातील आहे?? अरे हे असले भूत प्रेत आपण आधी कधीच पाहिलेले नाही. मला तर रात्री खूप भीती वाटत होती. पण तरी मी पुर्णपणे घाबरलो असे दाखवले नाही. मला तर हे काही बरोबर वाटत नाहीये. ”

“आशु, तू खरच खूप भोळा आहेस. तुला खरंच वाटत हे भूत प्रेताच काम आहे? या गावात काही तरी गडबड आहे पण ती भुताची नाही हे मी नक्की सांगू शकतो.

तु लोकांना पाहत असतोस पण मी नेहमी ध्यानस्थच असतो त्यामुळे माझं लक्ष एका जागी केंद्रित असतं. आशु, आपलं मन हेच सगळ्या गोष्टींवरचा उपाय आहे. ध्यानस्थ अवस्थेत असताना मन आणि बुद्धी जेव्हा एकाग्र होते तेव्हा तुला वाईट प्रवृत्ती

आजूबाजूला असल्याचा भास होतो. आणि मला हे असं काहीही वाटत नाही. गावकऱ्यांना भाषण देताना बहुतेक तुझं डोकं काम करत नसावं. 4 दिवसांत तू काही गोष्टी पाहिल्या नाहीयेस. भक्तिभावाने येणारे गावकरी, आपल्या घरच्या समस्या घेऊन येणाऱ्या आई, बहिणी सगळयांच्या चेहऱ्याची ओळख आहे मला. पण रोज येणाऱ्या 100 -150 लोकांपैकी 5 -6 जण अशे आहेत जे येतात पण माझा आशीर्वाद घेण्यासाठी नाही तर आपल्यावर नजर ठेवण्यासाठी. ते येतात, आपल्याला पाहतात, त्यांची आपापसात काही तरी कुजबुज होते आणि ते निघून जातात. अजून फक्त 4 दिवस थांब अष्टमीला बघ मी काय करतो तोपर्यंत मी सांगतो तसे कर आणि आरामात रहा. " देव.

त्यानंतर देव मंदिराच्या बाहेर ध्यानस्थ बसला. नेहमीप्रमाणे सगळी लोक जमा झाली. आशुने बोलायला सुरुवात केली.

"समस्त गावकरी बंधुंनो, आम्हाला येऊन इथे 4 दिवस झाली. आज चतुर्थी म्हणजे गुरुमहाराज यांच्यासाठी खूप महत्त्वाचा दिवस. आणि म्हणूनच आज संध्याकाळी चंद्रोदयवेळी गुरुमहाराज एक पूजा करतील आणि एक मेणबत्ती या गावाच्या वेशीवर ठेवतील. जसजशी ती मेणबत्ती संपेल तसतशी या गावावरच्या संकटांची राख होईल. ती मेणबत्ती म्हणजे साक्षात गुरुमहाराज यांचा अंश.

त्यामुळे त्या मेणबत्तीला हात लावणारा मनुष्य नरक यातना भोगेल. आजपासून ज्या ज्या व्यक्तींना वाईट सावल्या दिसतील त्यांचे जीवन अष्टमीला धोक्यात येऊ शकते. अश्या व्यक्तींना फक्त गुरुमहाराजच वाचवू शकतात. आज पर्यन्त गावकऱ्यांना वाईट सावल्यांचा भास होत असेलही पण आज ती मेणबत्ती पेटवल्यानंतर काही ऊर्जा निर्माण होईल आणि वाईट गोष्टी वाईट लोकांकडे आकर्षित होतील. त्यामुळे तुमचे मन स्वच्छ, निर्मळ राहील याची काळजी घ्या. देवाचे नामस्मरण करा. चला आता सर्वांनी आशीर्वाद घेऊन निघा, आणि संध्याकाळी पूजेला वेळेवर या. ”

हे सगळे ऐकल्यानंतर गावकरी थोडेसे घाबरले. आजपर्यंत कळत नकळत केलेल्या गुन्ह्याची कबुली देवाजवळ देऊन मनातल्या मनात देवाची माफी मागत होते.

भैरवबाबांचे अनुयायी मात्र घाबरले नव्हते. आजपर्यंत त्यांनी गावकऱ्यांना अशाच भाकड कथा सांगून घाबरवले होते त्यामुळे त्यांना माहिती होते आपल्याला काहीही होणार नाही. गुरुमहाराजांची टिंगल करण्यातच आता त्यांचा सगळा दिवस गेला.

ठरल्याप्रमाणे गुरुमहाराजांनी गावाच्या वेशीवर पूजा केली. मेणबत्ती लावताना त्यांच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज होते. समस्त गावकरी ते पाहून हात जोडू लागले. त्यानंतर सर्वजण आशीर्वाद घेऊन आपापल्या घरी निघून गेले.

मध्यरात्रीनंतर भैरवबाबांच्या अनुयायांना वेगवेगळे आवाज येऊ लागले. ते चौघेही आता एकत्र आले. थोडेसे घाबरलेले पण संशयी. एका खोलीत एकत्र येऊन त्यांनी खोलीतील लाईट चालू ठेवला. पण थोड्याच वेळात तो लाईट बंद चालु होऊ लागला. किरकिर असा रातकिड्यांचा आवाज येत होता. भयाण शांतता होती. आणि त्यांना सावली दिसल्याचा भास झाला. आता मात्र ते खुप घाबरले.

"अरे रमेश, आजवर आपण करत होतो तेच आपल्यासोबत होत आहे. पण हे त्याहून वेगळे आहे असे वाटते. खरंच जर ते गुरुमहाराज एखादे सिद्ध पुरुष असतील तर????? म्हणजे आपला जीव धोक्यात आहे. तू त्यांना गावाच्या वेशीवर पाहिले नाहीस. वेगळेच तेज आहे त्यांच्या चेहऱ्यावर. मला आता खूप भीती वाटत आहे. " बाबा

"बाबा, तू शांत रहा. मान्य आहे आपण आजवर लोकांना फसवले आहे पण कोणाचेच नुकसान केले नाही. कधी कोणाला

हानी पोहोचवली नाही. त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतला एवढच. पण त्यासाठी आपला जीव धोक्यात येणार नाही. आणि तू म्हणतोस तसे ते खरंच सिद्ध पुरुष असतील तर आपण त्यांना जाऊन भेटू आणि सगळे खरेखरे सांगून टाकू. " रमेश.

"तुम्ही दोघेही डोक्यावर पडलात अस वाटतंय आता मला. तुम्ही एकटेच नाही यात. तुमच्यासोबत आम्ही दोघेही आहोत आणि आपल्यावर आपला बाप आहे हे विसरू नका. त्याला विचारल्याशिवाय पाणी सुद्धा पिणे आपल्याला जमणार नाही आणि तुम्ही खरं खोटा करायला निघालात. झोपा आता, बघू उद्या काय करायचं ते. "श्याम.

दुसऱ्यादिवशी सकाळी उठल्यावर त्यांच्या मनात एकच प्रश्न होता. गावात किती जणांना सावल्या दिसल्या??. त्यासाठी त्यांना मंदिरात जावे लागणार होते. मंदिरात गेल्यावर तिथे वेगळाच कार्यक्रम चालू होता.

4-5 लोकं गुरुमहाराजांच्या पायावर लोटांगण घालत होती. त्यातला एक मंदिराचा पुजारी होता. तो जोरजोराने ओरडून गयावया करत होता.

" गुरुमहाराज, मला वाचवा. मी आज सगळ्या गावासमोर कबूल करतो, मी गुन्हा केलाय. लोकांच्या श्रद्धेचा गैरवापर केलाय.

त्यांना फसवलं आहे, देवाचे पैसे मी घेतले. आणि म्हणूनच मला काल रात्री सावल्या दिसल्या. माझ्या चुका पदरात घ्या महाराज, मला माफ करा. मला वाचवा. ”

प्रत्येकजण आपापल्या चुका कबूल करून माफी मागत होते. गुरुमहाराजांनी कमंडलूतील पाणी माऊलीच्या हातात दिले. माऊलीने ते स्वतःच्या डोळयाला लावले. मग क्षणभर डोळे मिटले आणि मग बोलायला सुरुवात केली.

“गावकऱ्यांनो, तुम्ही महाराजांच्या पायाशी आलात तेव्हाच तुम्हाला माफी मिळाली. तुम्ही केलेल्या छोट्यामोठया गुन्ह्यांची कबुली आम्ही ऐकली. भोळया भाबड्या लोकांची फसवणूक हा खूप मोठा गुन्हा आहे. त्याचे प्रायश्चित तुम्हाला करावे लागणार आहे. तुम्हाला तुमचे प्रायश्चित काय असेल ते अष्टमीला कळेल. तुम्हाला उपरती झाली म्हणून गुरुमहाराज पवित्र कमंडलूमधील पाणी त्यांच्या हाताने आशीर्वाद देऊन तुमच्यावर शिंपडतील त्यांनतर तुम्हाला सावल्या दिसणार नाहीत. तुमच्यातील वाईट शक्ती गुरुमहाराज स्वतःवर ओढून घेतील. पण अष्टमीला सांगितलेले प्रायश्चित करणे तुम्हाला बंधनकारक असेल नाहीतर तुमचा जीव जाऊ शकतो. ” माऊली.

हे सगळे ऐकून भैरवबाबांचे अनुयायी चकित झाले. कोणालाच माहिती नसणाऱ्या गुन्ह्यांची कबुली ह्या लोकांनी स्वतः दिली. गुरुमहाराज खरंच एवढे शक्तिशाली आहेत का?????????

आता मात्र चौघेही गुरुमहाराज जवळ जाण्यासाठी कबूल झाले होते. पण श्यामने आणखी एक दिवस वाट पाहण्यासाठी त्यांना तयार केले.

रात्री आशु आणि देव दोघेही बाहेर पडले. कोणी आपला पाठलाग करत नाही याची खात्री करून वेशिजवळ आले. मंजिरीही कोणाला नकळत गावाच्या वेशिजवळ आली.

“ देव, आपल्याला वाटते तेवढे सोपे बहुधा नाही हे प्रकरण. कोण कोण यात सामील आहे हे अजून आपल्याला कळले नाही आणि माझ्यामुळे आता तुम्ही दोघेही यात अडकला आहात. ” मंजिरी.

हे ऐकून देवने थोडेसे हसतच आशुकडे पाहिले.

“मंजिरी, आपल्याला काही माहिती नाही असे तुला वाटते. सत्य परिस्थिती ही आहे की आम्ही जो कोणी याच्या मागे आहे त्याजवळ पोहोचलो आहोत. मी बांधलेले अंदाज जर खरे ठरले तर उद्या रात्रीच आपण सगळ्या गुन्हेगारांना पकडू. तू आता घरी जा

मंजिरी आणि काळजी न करता निवांत झोप. मी आणि आशु उरलेले काम आटपून येतो. ” देव.

मंजिरी घरी निघून गेली. देव आणि आशु ठरलेल्या गोष्टीवर चर्चा करत होते.

“आशु, आपल्याला ज्याचा संशय आहे ते सगळया गावाला कळल्यावर हे सत्य पचवणे कठीण जाणार. त्या चौघांवर तु लक्ष ठेऊन असशीलच. उद्या संध्याकाळ पर्यंत या सगळया प्रकरणाचा उलगडा होईल, तोपर्यंत हे पत्र तुला एका ठिकाणी आजच्या आज पोहोचवायचे आहे. ” देव.

आशु देवने सांगितलेले काम करण्यासाठी निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी चौघे नेहमीप्रमाणे मंदिराच्या बाहेर जमले. त्यांनी पाहिले की कालच्या प्रकारानंतर कबुली दिलेले लोक गुरुमहाराजांच्या पायावर डोके ठेऊ लागले. आणि त्यांना सावल्या दिसणे बंद झाले म्हणून आभार मानू लागले. सगळी कडे महाराजांचा जयजयकार करू लागले.

आता त्यांचा निर्णय पक्का होता ते गुन्ह्याची कबुली देणार होते.

श्यामने तिघांना घरी जायला सांगितले कारण त्याच्याकडून हे सगळं जो कोणी करवून घेत होता तो फक्त श्यामलाच माहिती होता बाकी तिघे फक्त श्यामच्या बोलण्यावरच काम करायचे.

श्याम संध्याकाळनंतर घरी आला. तेव्हा तिघेही घाबरले होते.

“ श्याम, अरे तू सकाळपासून गायब आहेस. आम्हाला तुझी किती काळजी वाटली. कुठे होतास तू ? काय झाले ?”रमेश

“मी आपल्या मालकाला सगळे सांगून टाकले. त्यांचे नाव कुठेही येणार नाही या अटींवर त्यांनी आपल्याला जीवन दिले. मला तर खुप भीती वाटत होती. वाटले की गुरुमहाराजना सगळे सांगायच्या आधीच मला मरण येते की काय? पण कसे तरी मी माझा जीव सोडवून आलो. ” श्याम.

इकडे पहाटे सगळे गाढ झोपेत असताना त्यांच्या घराबाहेर कसली तरी हालचाल होत होती. 4-5 माणसे काठ्या घेऊन आली होती. त्या चौघांचा जीव धोक्यात आहे हे त्यांना माहिती नव्हते. ते उद्या गुरुमहाराज समोर आपल्या गुन्ह्याची कबुली देण्याच्या विचारात झोपले होते. तेवढ्यात दार तोडून ती चार माणसे आत आली आणि त्यांच्या सोबत त्यांचा मालक सुद्धा.

दाराच्या आवाजामुळे सगळे घाबरून उठले. समोर चार पाच माणसे काठ्या घेऊन होती. श्याम हे पाहून चकित झाला. ती लोक

आपल्याला मारण्यासाठी आली हे त्यांनी क्षणात ओळखले. मालकांनी मला सोडले ते ह्या सगळयांसोबत मारण्यासाठी. आता ते चौघेही गयावया करू लागले.

“ तुम्हांला चौघांना जिवंत सोडून मी माझ्या डोक्यावर टांगती तलवार नाही ठेऊ शकत. तुम्हाला मारण्यातच माझा फायदा आहे. ” मालक.

त्याने एवढे बोलून त्यांना मारण्याचा इशारा केला आणि अचानक कुठून तरी गोळी झाडल्याचा आवाज झाला. पोलीस त्यांच्या पूर्ण टीम सोबत त्यांना अटक करायला आली होती. सर्व गुन्हेगारांच्या तोंडावर काळा कपडा आणि हातात बेड्या ठोकून पोलीस त्यांना घेऊन गेली.

आज अष्टमी होती. सकाळी काय होणार याच्या उत्सुकतेमध्ये सगळे गावकरी मंदिराजवळ गोळा झाले होते. मंजिरीही आली होती आणि सोबत तिच्या वडिलांनाही आणले होते. आज ह्या सगळ्याचा शेवट होणार होता. थोड्याच वेळात माऊली आणि गुरुमहाराज म्हणजेच आशु आणि देव नेहमीप्रमाणे आले.

माऊलीने बोलायला सुरुवात केली.

“ गावकऱ्यांनो, आजपर्यंत तुम्ही माझ्या तोंडून गुरुमहाराज यांचे उपदेश ऐकलेत. पण आज गुरुमहाराज स्वतः तुम्हाला उपदेश देतील. " माऊली.

“गावकऱ्यांनो, तुमच्या गावात मला मिळालेले प्रेम, श्रद्धा पाहून खरच मला खुप आनंद झाला. ज्या कार्यासाठी मी या गावात आलो होतो ते कार्य आता संपन्न झाले आहे. आता या गावाला कसलीही अडचण होणार नाही, कुठलेही संकट येणार नाही. तुमच्यावर आलेल्या संकटाला आम्ही पकडून ठेवले आहे. इन्स्पेक्टर या. ” गुरुमहाराज

इन्स्पेक्टर नाईक पहाटे पकडलेल्या सर्व गुन्हेगारांना घेऊन आले. आणि त्यांनी एक एक गुन्हेगाराच्या तोंडावरचा काळा कपडा काढला. भैरवबाबांचे अनुयायी पाहून सगळ्या गावाला धक्का बसला. ज्यांनी गावाला वाचवण्याचे वचन घेतले होते तेच गावावर संकट होते. त्यानंतर इन्स्पेक्टरने शेवटच्या माणसाच्या तोंडावरचा कपडा काढला आणि मंजिरीला काय बोलावे तेच कळले नाही.

होय, मंजिरीचे काका होते ते. एवढ्या वर्षापासून मंजिरीच्या वडिलांसोबत सावली प्रमाणे असणारे.

“काका, तुम्ही?? तुम्ही केलेत हे सगळे???. तुम्ही माझ्या वडिलांवर हल्ला केलात???. तुम्ही गावकऱ्यांना लुबाडले???. अंधश्रद्धा दुर करण्यासाठी माझ्या वडीलांनी स्वतःचा, माझा आणि मंदारचा जीव सुद्धा धोक्यात टाकला आणि तुम्ही??? स्वतःच्या भावाचा जीव घेण्याचा प्रयत्न केला, स्वतःच्या पुतणीला फसवले. एवढे निर्दयी कसे झालात तुम्ही काका???? तुम्हाला याची शिक्षा मिळेलच पण मला तुमच्याकडून ऐकायचे आहे. का केलेत तुम्ही हे सगळे?? काय कमी ठेवली होती माझ्या वडिलांनी???”मंजिरी.

“कमी?? खुप जास्त केले. म्हणूनच उपकार केलेत तुम्ही माझ्यावर हे सतत मला जाणवत राहिले. माझ्या छोट्या छोट्या गरजा सुद्धा मला त्यांच्याकडून पैसे घेऊन भागवाव्या लागत. मीच इथे बेवारस असल्यासारखा, तुमचा गुलाम बनून होतो तर माझ्या मुलांना मी काय देणार या भावनेने मी कधी लग्न केले नाही. तुझ्या वडिलांना राजकारण करायचे नव्हते पण त्यांनी मलाही कधी माझ्या इच्छा आकांक्षा विचारल्या नाहीत. मला सरपंच पदाची निवडणूक लढवायची होती पण त्यांनी नकार दिला. पैश्याची गरज भागवण्यासाठी मी भैरवबाबांचे अनुयायी आणले. त्यांच्याकडून मला पैसे मिळत होते तेव्हा ह्यांनी अंधश्रद्धा निर्मुलनचे कार्य हातात घेतले आणि माझी कमाई परत बंद झाली. माझ्या सगळ्या कामात आजवर हे एखाद्या मांजरीसारखे आडवे गेले. लहानपणापासून

त्यांच्या सावलीच्या बाहेर पडून माझे अस्तित्व निर्माण करायचा मी खूप प्रयत्न केला पण अप्पा जिवंत असे पर्यंत ते शक्य नव्हते. म्हणून त्यांना मारण्याचा मी निर्णय घेतला. पण ते त्यातूनही वाचले. माझे नशीब चांगले म्हणून ते कोमात गेले. त्यानंतर हे सगळे माझ्या हातात आले असे मला वाटत असतानाच मला वकीलाकडून माहिती मिळाली पैश्याचे व्यवहार त्यांच्यानंतर फक्त तु करू शकतेस आणि माझे हात परत बांधले गेले. तू सुद्धा तुझ्या वडिलांच्या मार्गाने गेलीस. हे सगळे त्रास कमी म्हणून हे गुरुमहाराज माझ्या मागे लागले. माझं पितळ उघड पडायची वेळ आली म्हणून नाईलाजाने मला ह्या चौघांनाही मारायचा प्रयत्न करावा लागला. पण कधीच न वेळेवर येणारी पोलीस इथे कशी आली कोण जाणे" काका.

"सगळी गुरुमहाराज यांची कृपा" इन्स्पेक्टर नाईक हसत हसत गुरुमहाराज यांना नमस्कार करू लागले.

" पाहिलत गावकऱ्यांनो, तुमची अंधश्रद्धा तुमच्या संकटाचे मूळ होते. कोणावरही विश्वास ठेऊन तुम्ही स्वतःहून हे संकट ओढवले होते. असल्या खोट्या आणि कपटी भोंदूबाबाना पुन्हा या गावात प्रवेश देऊ नका. दिखावा करणे, जादू दाखवणे खुप सोपे आहे. मी इतके दिवस हेच केले. आणि तुम्ही मलाही गुरुमहाराज

म्हणून डोक्यावर घेतलं. गावकरी बंधूंनो, मी देव पटवर्धन. मी वकील आहे. मंजिरीने मला तुमच्या गावातील अडचणी सांगितल्या. तिच्या भावाच्या आणि तिच्या जीवाला धोका होता. त्याची सत्यता काकाच्या बोलण्याने झाली आहे. त्यामुळे हे संकट मला वेगळ्या पद्धतीने दूर करणे भाग होते. या गावासाठी मंजिरी आणि तिच्या वडिलांनी जे अंधश्रद्धा विरहित गावाचे स्वप्न पाहिले ते पूर्णत्वास न्यायची ही वेळ आहे. मी तुमच्या चांगल्यासाठी जरी हे सगळे केले असले तरी मी तुम्हाला फसवलेआहे आणि म्हणूनच मी तुमची मनापासून माफी मागतो.

या चौघांवर माझा मित्र आशुने नजर ठेवली होती. आणि त्यांच्या वागण्यात झालेला बदल, त्यांचे घाबरलेले चेहरे, त्यांच्यातील संवाद यावरून त्यांच्या व्यतिरिक्त आणखी कोणी तरी या कटात आहे हे आम्हाला कळले आणि श्यामचा पाठलाग केल्यावर मंजिरीच्या काकांना पाहून आम्हालाही तेवढाच धक्का बसला. काका या चौघांचा जीव घेणार ही खात्री पटल्यामुळे मी इन्स्पेक्टर नाईकला पत्र लिहिले. ते मला चांगलंच ओळखतात ह्या आधीही आम्ही काही केसेस सोडवल्या आहेत. आता हे सगळे झाल्यावर मला तुम्हाला मनापासून एक गोष्ट सांगायची आहे, तुम्ही सर्वांनि एकत्र येऊन गावावर आलेल्या संकटांचा सामना केला पाहिजे. मंजिरी आणि तिच्या वडिलांसारख्या लोकांवर विश्वास

ठेवला पाहिजे. भोंदू आणि कपटी लोकांपासून सावध राहिले पाहिजे.

काकांनी एवढी वर्षे त्यांच्या वाईट हेतूसाठी आटोकाट प्रयत्न केले पण ह्याचा शेवट त्यांना तुरुंगातच नेणार आहे. घेऊन जा ह्यांना इन्स्पेक्टर. " देव.

मंजिरी आणि तिच्या वडिलांनी देव आणि आशुचे मनापासून आभार मानले. सगळ्या गावकऱ्यांनीही त्यांचे अभिनंदन केले. याशिवाय गावातर्फे त्यांना भेट दिली आणि त्यांचा सत्कार केला.

गावाला संकटातून सोडवून देव आणि आशूची आता परत पुण्याला जायची वेळ आली होती. थोडया दिवसांतच मंजिरीचा सहवास त्याला आता हवाहवासा वाटत होता पण हे सगळे सांगण्याची त्याच्या मनाची तयारी होत नव्हती. एवढ्या वर्षांमध्ये तो तिला विसरला नव्हता. त्याचे पाय जड झालेत असे त्याला वाटत होते. मंजिरीला मागे सोडून जाताना त्याला एवढा त्रास होईल असे त्याला वाटले नव्हते.

मंजिरीच्याही डोळ्यात तो त्रास त्याला दिसत होता. आताही तिला विचारावे आणि आपल्या सोबत न्यावे असे त्याचे मन त्याला सांगत होते पण तिच्यावर असलेली जबाबदारी, तिचे

कर्तव्य यामुळे तिने पुन्हा नकार दिला तर तो नकार देवला पचवणे अवघड जाईल म्हणून जड अंतःकरणाने तो आशूला घेऊन पुण्यात आला.

पुण्यात आल्यावर 4 दिवस त्याचे कशातच मन लागत नव्हते. आशूलाही हे सगळे कळत होते.

"देव, खुप दिवस झाले फेरफटका मारून, चल जरा बाहेर जाऊन येऊ. कदाचित तुला बाहेर गेल्यावर बरे वाटेल. " आशु

आशुच्या हट्टापुढे नेहमीच देवला हात टेकवावे लागतात तसा तो आताही काहीही न बोलता त्याच्यासोबत निघाला. तो अजूनही त्याच विचारात होता. काय करत असेल आता मंजिरी??? तिलाही माझी आठवण येत असेल का? मी सोडून आल्यावर पुन्हा गावात काय झाले असेल?? मी असाच तिच्याशिवाय जगू शकेल का??

चालत चालत तो परत वैशाली हॉटेल जवळ आला. आणि हे कळल्यावर त्याने अचानक आशुकडे पाहिले.

" देव, आपल्याला ह्या केस साठी पंधरा दिवसांची डेड लाईन होती. पण तु आठ दिवसांतच ही केस उत्तम रित्या सोडवलीस. खरंच तुझ्या बुद्धीचा, तुझ्या व्यक्तिमत्त्वाचा हेवा वाटेल कोणालाही. मी खुप भाग्यवान आहे मी तुझ्या सोबत आहे ते. तुला माझ्याकडून

नेहमीच प्रशंसा ऐकायला आवडते. आज मी मान्य करतो, माझा मित्र काहीही शक्य करू शकतो. तु सर्व गोष्टीसाठी योग्य आहेस. म्हणून मला तुला काही तरी द्यायचे आहे. पण सध्यातरी एक कॉफी घेऊ. " आशु.

आतमध्ये त्यांच्या नेहमीच्या जागी मंजिरी त्यांची वाट पाहत होती. देवला विश्वासच बसत नव्हता.

"म्हणजे मंजिरी एवढ्या लांबून माझ्यासाठी परत आली. तिलाही माझ्याशिवाय रहावले नाही"

मनातल्या मनात तो स्वतःशीच बडबडत होता. त्याच्या आनंदाला कुठलीही सीमा नव्हती.

"शेवटी मलाच काही तरी करावे लागले. तू आयुष्यभर आता माझा ऋणी राहशील देव. मीच मंजिरी आणि तिच्या वडिलांसाठी पत्र सोडून आलो होतो. एवढ्या वर्षांपासून मंजिरीचा त्याग आणि समर्पण पाहून तिच्या वडिलांनी तिला जायची परवानगी दिली. त्यांनाही मंजिरीने तुझ्यासोबत सुखी राहावं असे वाटते. म्हणूनच मी उद्या तुमच्या दोघांच्या लग्नाची व्यवस्था केलेली आहे. उद्या तुमचं लग्न आहे. "आशु.

हे सगळे ऐकून देवला स्वप्न आहे की सत्य हेच कळत नव्हते. त्याचे स्वप्न आता खरे झाले होते. मंजिरीसोबत पुढील आयुष्य आनंदात घालवण्यासाठी तो तयार होता. त्याला मिळालेली डेड लाईन त्याच्या दुःखाचा शेवट करणारी ठरली.

## पुस्तक म्हणजे मैफल

फ़ेसबुक, whatsapp, किंवा अनेक नवीन माध्यमांत वाचन होतंच. फ़ेसबुक चं नावच मुळी 'बुक' आहे. मधेच एखादी लकेर, नंतर कुठे विनोद, अचानक कोणी तरी आक्रस्ताळं राजकीय भाष्य करणार आणि ते संपतं न संपतं तो एखाद्या मृत्यूची बातमी वा लग्नाचा वाढदिवस. या माध्यमांतूनही ज्ञान, भावना, यांचा खेळ चालतो; नाही असं नाही. पण तो क्षणिक असतो. ओझरता असतो. एखादी सुंदर लकेर मन मोहून टाकते खरेच. पण मैफलीचा गंध जसा आयुष्यभर दरवळत रहातो तसे होत नाही.

आपल्या मनाला, आपल्या बुद्धीला वरच्या दर्जावर नेण्यासाठी पुस्तके आवश्यक असतात. मग ती छापील असो वा ई. आपले मन आणि बुद्धी यांना दर्जेदार खुराक द्या. पुस्तके वाचत रहा. ई साहित्य ईपुस्तके विनामूल्य देते त्यामागे एक उद्देश आहे. एक मन, एक बुद्धी जेव्हा वरच्या पायरीवर जातं तेव्हा ती व्यक्ती समृद्ध होते. जेव्हा समाजातील असंख्य लोक समृद्ध होतात तेव्हाच समाज प्रबुद्ध होतो.

वाचत रहा. पुस्तके वाचत रहा.

[www. esahity. com](http://www.esahity.com)